जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ८७६ दिनांक - १६/१२/२०२३**

बिबवेवाडी पोलीस स्टेशन पुणे शहर

## "मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी कार्यभार स्वीकारल्या नंतरची मकोका अंतर्गत १०० वी कारवाई "

## सौरभ शरद शिंदे (टोळी प्रमुख)व त्याचे इतर ४ साथीदार यांचेवर मकोका कारवाई

दि.०८/११/२०२३ रोजी कुसळकर किराणा मालाचे दुकानाचे गल्लीतुन आत, तीन मंदिराचे मोकळया मैदानात, अप्पर-बिबवेवाडी, पुणे.येथे यातील फिर्यादी यांचा मुलगा हा रात्रौ १२.३० वा चे सुमारास जेवण करुन घरी परत येत असताना त्याचे ओळखीचे **आरोपी नामे १) सौरभ शिंदे, २) तेजस जगताप, ३) चंदर राठोड, ४) अनिकेत काटकर व ५) पंकज दिवेकर** सर्व अप्पर बिबवेवाडी पुणे यांनी आपआपसात संगनमतकरुन फिर्यादी यांचा मुलास पकडुन त्यास कुसळकर किराणा मालदुकानाचे गल्लीतुन आत तीन मंदिराचे मोकळया मैदानात अप्पर बिबवेवाडी येथे घेवुन जावुन पुर्वी झालेल्या वादावरुन सदर आरोपींनी त्यांच्या कडील लोखंडी रॉड व बांधकामासाठी वापरण्यात येणारी लाकडाची फळीने त्याचे दोन्ही हाताचे मनगटावर, दोन्ही पायाचे गुडघा व नडग्यांवर, पोटावर व डोक्यात वार करुन गंभीर जखमी करुन **त्यास जिवे ठार मारण्याचा प्रयत्न** केला.म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन बिबवेवाडी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. **२३९/२०२३, भा.दं.वि.कलम ३०७,३२३,१४३,१४७,१४८,१४९, महाराष्ट्र पोलीस अधि. कलम ३७ (१) सह १३५ अन्वये** गुन्हा दाखल करणेत आला आहे.

दाखल गुन्हयांचे तपासा दरम्यान आरोपी नामे १)**तेजस शंकर जगताप, वय २० वर्षे, रा. बी/३५/१२, अप्परइंदिरानगर, बिबवेवाडी, पुणे.(टोळी सदस्य)** २) **अनिकेत सुधीर काटकर, वय २२ वर्षे, रा. बी/३६/०३, अप्पर इंदिरानगर बिबवेवाडी, पुणे. (टोळी सदस्य)** यांना दाखल गुन्हयात **अटक करण्यात आली असुन ते सद्या येरवडा जेल पुणे येथे आहेत.**तसेच आरोपी नामे १) सौरभ शरद शिंदे वय २२ वर्षे, रा.बी ३५/१२ अप्परइंदिरानगर बि.वाडी पुणे.(टोळी प्रमुख)२) चंदर उन्नप्पा/हुन्नप्पा राठोड, वय २२ वर्षे, रा.चैत्रबन वसाहत, बिबवेवाडी पुणे.(टोळी सदस्य)व ३) पंकज संजय दिवेकर वय १९ वर्षे, रा. स.नं. ६४९, गणपतीमंदिरा जवळ, खडकेवस्ती, अप्पर बिबवेवाडी पुणे.(टोळी सदस्य)हे **सदर गुन्हयामध्ये पाहिजे आरोपी आहेत.**

आरोपी सौरभ शिंदे(टोळी प्रमुख)याने टोळीमधील वरील सदस्यांना बरोबर घेवुन दखलपात्र गुन्हा करुन, टोळीची दहशत व वर्चस्व निर्माण करुन,त्यायोगे बेकायदेशीर मार्गाने स्वत:साठी अथवा टोळीतील अन्य सदस्यांसाठी अवैध मार्गाने आर्थिक फायदा मिळविण्याच्या उद्देशाने संघटीत गुन्हेगारी संघटनेचा प्रमुख म्हणुन किंवा संघटनेच्या वतीने एकटयाने किंवा संयुक्तपणे, हिंसाचाराचा वापर करुन किंवा हिंसाचाराची धमकी देवुन किंवा जुलुम जबरदस्ती करुन किंवा अन्य अवैद्य मार्गाने बेकायदेशीर खुनाचा प्रयत्न,गंभीर दुखापत,मारामारी, बेकायदेशीर घातक शस्त्रे जवळ बाळगणे,दरोडा या गुन्हयाद्वारे सर्वसामान्य जनतेमध्ये दहशत निर्माण केली असुन, असे गंभीर स्वरुपाचे गुन्हे त्याने संघटीतपणे केले आहेत.यातील नमुद आरोपी यांचे विरुध्द वेळोवेळो प्रतिबंधात्मक कारवाई करुन देखील त्यांनी पुन्हा पुन्हा गंभीर स्वरुपाचे गुन्हे केलेले आहेत.

यातील आरोपी यांनी संघटीत पणे दहशतीच्या मार्गाने स्वतःच्या आर्थिक फायदयाकरीता सदरचा गुन्हा केल्याचे दिसुन आल्याने प्रस्तुत गुन्हयास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४)प्रमाणे अंतर्भावकरणे कामी.वरिष्ठ पोलीस निरीक्षक,बिबवेवाडी पोलीस स्टेशन,पुणे शहर, श्रीमती सविता ढमढेरे यांनी पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०५,पुणे शहर,श्री.आर.राजा यांचे मार्फतीने अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.रंजनकुमार शर्मा यांना प्रस्ताव सादर केला होता.

सदर प्रकरणाची छाननी करून बिबवेवाडी पोलीस ठाणे,गुन्हा नोंदक्र.२३९/२०२३ भा.दं.वि.कलम ३०७,३२३,१४३,१४७,१४८,१४९, महाराष्ट्र पोलीस अधि. कलम ३७(१)सह १३५ अन्वये दाखल असलेल्या गुन्हयांत महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४)प्रमाणेचा अंतर्भाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर श्री.रंजनकुमार शर्मा यांनी मान्यता दिलेली आहे.

दाखल गुन्हयाचा पुढील तपास सहा.पोलीस आयुक्त,वानवडी विभाग,पुणे शहर,श्री.शाहुराजे साळवे, हे करीत आहेत.

सदर कामगिरी मा.पोलीस आयुक्त पुणे शहर,श्री.रितेशकुमार,मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे शाखा,पुणे,(पोलिस सह आयुक्त अतिरिक्त कार्यभार)श्री.रामनाथ पोकळे,मा.अपर पोलीस आयुक्त पूर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.रंजनकुमार शर्मा,मा.पोलीस उप आयुक्त परि.०५,पुणे शहर,श्री.आर राजा, मा.सहा.पोलीस आयुक्त ,वानवडी विभाग,पुणे शहर,श्री.शाहुराजे साळवे यांचे मार्गदर्शनाखाली,बिबवेवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्रीमती सविता ढमढेरे, पोलीस उप-निरीक्षक बाळु शिरसट, तसेच सर्व्हेलन्स पथकातील पोलीस अंमलदार दैवत शेडगे, अनिल डोळसे व कृष्णा फुले यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेशकुमार यांनी पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार स्विकारल्यानंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देवुन,शरीराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व समाजामध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन,गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल,यावर भरदेण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश दिले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मकोका अंतर्गत केलेली सन २०२३ या चालू वर्षातीस एकूण १०० वी कारवाई आहे. आता पर्यंत एकूण ६४९ आरोपीवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आलेली आहे.**